
भय कथा
काल्पनिक मनोरंजनात्मक कथा
मोहन रावळ
परी प्रकाशन

भय कथा

© सुरक्षित

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी


**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | वाडा विकायचा नाही ....... | ३ |
| २. | गुरूची कृपा ............... | १७ |
| ३. | अनु, तू आलीस? ........... | २१ |
| ४. | सासूबाई मी चुकले ! ........ | ३१ |
| ५. | आरशातील भुतावळ ....... | ३८ |
| ६. | कोणीतरी आहे तिथं ......... | ४७ |
| ७. | भूलभुलैया ................. | ५६ |
| ८. | मि. गिलबर्ट तुम्ही चुकलात ! | ६६ |
| ९. | टुकारा कम बॅक ............ | ७४ |
| १०. | शूर तेंगझेंग आणि भुतावळ .. | ७९ |
| ११. | तो भास नव्हता... ......... | ८८ |
| १२. | तो आला होता... .......... | ९२ |
| १३. | तीन भुतं .................... | ९७ |
| १४. | राजू, पुन्हा जाऊ नकोस.. ... | १०१ |
| १५. | भीती कशाची कुणाला? ... | १०८ |
| १६. | बिज्जलची भुतावळ ........ | ११२ |
| १७. | स्मशानातले भूत ............ | ११९ |
| १८. | कपाटातील हडळ .......... | १२४ |
| १९. | ब्रह्मराक्षस जागा झाला ..... | १३७ |
| २०. | तिचा जीव गुंतला होता ! .... | १४० |
| २१. | सटाक् फटाक् ............. | १४४ |


भूत-पिशाच्च, हडळ, चेटकीण या सर्व काल्पनिक गोष्टी असून या पुस्तकातील सर्व कथाही काल्पनिक आहेत. त्या फक्त मनोरंजनाच्या हेतूने तयार करण्यात आल्या आहेत, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



# वाडा विकायचा नाही

त्या पेठेतील बहुतेक भागात उंचच उंच इमारती उभ्या होत्या. शहरातील लोकसंख्या वाढत होती. आता जुन्या पद्धतीची कौलारू घरं पाहणंच दुर्मीळ होऊन बसलं होतं. जुनेपुराणे वाडे केव्हाच जमीनदोस्त झाले होते. वाढत्या लोकसंख्येसाठी वाडे घरं पाडून अपार्टमेंटस् उभे राहिले होते. गल्ल्या शब्द जाऊन कॉलनी शब्द रूढ होत होते.

पण त्या पेठेत अजून 'वकिलांचा वाडा' नामक अतिशय जुना वाडा शाबूत होता. वाड्यात परसदाराला विहीर होती. अनेक खोल्या होत्या. वाड्याची दर्शनी बाजू दुमजली होती. ती वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळच्या दोन मोठ्या बैठकीच्या खोल्यांमध्ये झोपाळे होते. त्याच्या कड्या-साखळ्या पितळी होत्या. त्या खोल्यांच्या छतांना नक्षीदार झुंबर होते. पूर्वजांचे काही फोटो व देवदेवतांच्या जुन्या तसबिरी होत्या.



वरच्या बैठकीच्या खोल्यात येण्यासाठी वाड्यातून वर येणारा एक लाकडी जिना होता. काळाच्या तडाख्यानं त्याच्या दोन पायऱ्या निखळल्या होत्या. त्या पायऱ्या दुरुस्त करण्याची ऐपत वाड्याच्या मालकिणीची नव्हती. वाड्यात झुडपं माजली होती. पिंपळाची मुळं आत घुसल्यामुळं एका भिंतीला भेगा पडलेल्या होत्या. विहिरीकडं जाणारी पायवाट स्पष्ट दिसत होती. बाकी वाड्यात गवत वाढले होते. वाड्याच्या कौलावरही काही वनस्पती उगवल्या होत्या. त्या पडक्या वाड्यात दिवसा जायचीही भीती वाटायची. कोणती भिंत केव्हा कोसळेल सांगता येत नव्हते.

त्या 'वकिलांच्या वाड्यात' दोघेजण राहात होते. एक वेडसर लाळ गळणारा व सारखा हात झाडणारा पंडितराव व त्याची वृद्ध आई देविकाबाई. ती विधवा असल्यानं तिचं कपाळ पांढरंफटक होतं. देविकाबाई गोऱ्यापान, नाकेल्या व हडकुळ्या होत्या. पंडितराव चाळीस पंचेचाळीस वर्षाचा झाला होता. तो वेडसर असल्याने त्याचे लग्नच झाले नव्हते. तो बैठकीच्या खोलीत बसून असे. आरामखुर्चीत बसून खिडकीतून बाहेरचे आकाश व येणारी-जाणारी माणसं पाहात राही.

सर्वत्र विजेचा लखलखाट असला तरी देविकाबाईंच्या वाड्यात मात्र अजूनही कंदील आणि समया पेटत होत्या. त्या कुठं कामालाही जात नव्हत्या तरी जगत होत्या. त्यांच्याबद्दल लोक म्हणत, 'त्यांना वाड्यात पुरलेला खजिना सापडलाय. ते त्यातलं सोनं विकतात, मोडतात व जगतात.'

खरं खोटं देव जाणे!

देविकाबाईंना सख्खा भाऊ अगर नातेवाईक कोणीच नव्हता. एक चुलत भाऊ होता. त्याचे नाव नानूमामा. हा नानूमामा पंचावन्न-छप्पन्न वर्षांचा होता. तो सदानकदा घाईत असायचा. दळून आणणं, बाजार आणणं, रेशन-रॉकेल आणणं वगैरे हे तो आपल्या संसाराबरोबर देविकाबाईंचेही करायचा. वाड्यात ये-जा करणारा हा नानूमामा तेवढा दिसायचा. किती सणवार आले, गेले पण वकिलाच्या वाड्याने कधी दारात दिवा लावला नाही. त्यामुळे हा वाडा गूढ व रहस्यमय बनून गेला होता. देविकाबाईच्या घरखर्चाचा भार नानूमामा उचलत होता. तो शिलाईकाम करत असे. 'कोण कुणासाठी फुकट करतो का?' काहीतरी स्वार्थ असतोच. नानूमामा त्यातलाच.



संस्थानकाळात विठ्ठलराव सरदेशमुख हे निष्णात वकील म्हणून नावाजलेले गेले होते. त्यांनी इंग्रजांच्या विरुद्ध अनेक केसेस जिंकल्या होत्या. त्या काळात म्हणजे दीड पावणेदोनशे वर्षांपूर्वी विठ्ठलरावांनी हा वाडा बांधलेला. त्या काळी तो सदैव गजबजलेला असायचा. नोकर-चाकर, स्वत:ची घोडागाडी असा रुबाब होता. पण नंतरच्या पिढ्यात हा शहाणपणा कुणाच्याच अंगात उतरला नाही. त्यांनी मिळकती करायच्या ऐवजी आहे त्या घालवण्यातच आयुष्य वेचले. एकशेदहा एकर जमिनीचे मालक असणारे सरदेशमुख आता या वाड्यापुरतेच राहिले. सगळी रया गेली. श्रीमंती गेली. दिवे लावायचे वांधे होऊन बसले होते.

'वकिलांचा वाडा' भर पेठेत मध्यवर्ती ठिकाणी होता. चांगला ऐसपैस होता. या वाड्याकडे

बिल्डर डेव्हलपर मोहनलाल मेहताची नजर वळली. हा वाडा मिळाला तर शंभराचे लाख होतील या विचाराने त्याने जाळं पसरायला सुरुवात केली. आधी इतरांकडून बाहेरून त्यानं चौकशी केली आणि एके दिवशी मोहनलाल मेहताची मोटार वकिलांच्या वाड्यासमोर थांबली. तो अगदी सभ्यपणानं त्या वाड्यात शिरला. एका खोलीचे दार उघडे होते. खांबाला टेकून वृद्ध देविकाबाई मेथीची भाजी निवडत होत्या. त्या दारात उभं राहून हात जोडत मोहनलाल म्हणाला,

'आईसाहेब नमस्कार.'

देविकाबाई उठल्या. त्यांनी एक लाकडी खुर्ची अंगणात आणून ठेवली व 'बसा' म्हणाल्या.

'मी मोहनलाल मेहता. या शहरात माझ्या मालकीच्या वीस अपार्टमेंटस् असून तीन कामे सुरू आहेत.' खुर्चीवर बसत मोहनलाल म्हणाला.

'म्हणजे?'

'त्याचं असं आहे, मी जमिनी, जुनी घरे, जुने वाडे विकत घेतो. मग तिथे ४–५ मजली इमारती बांधतो. त्यात २०–२५ फ्लॅट असतात. जुन्या मालकाला दुसऱ्या मजल्यावरचा एखादा फ्लॅट देतो. शिवाय जागेची रक्कमही. तुमचा वाडा जर मला तुम्ही विकत दिलात तर इथे चांगली इमारत उभी राहील. विचार करा, मी या वाड्याचे तुम्हाला वीस लाख रुपये देईन.'

'मेहतासाहेब, या वाड्याला वकिलांचा वाडा म्हणतात. फार जुना आहे. ही जुनी वास्तू या शहराची शान आहे. ती मी जपतेय.'

'शान जपा हो. पण तुमची हालत काय आहे ते कोणी पहायला येते का? उगाच काहीतरी सांगू नका. या उतारवयात पैसा घ्या आणि तीर्थयात्रेला जा. सोन्याचा घास खा.' मोहनलाल ऐसपैस बसत म्हणाला.

'आम्हा सरदेशमुख घराण्यात घरातल्या कर्त्या पुरुषाला विचारल्याशिवाय आम्ही बायका काही निर्णय घेत नाही.'

'असा कोणी कर्ता पुरुष आहे?'

'का नाही? माझा मुलगा आहे ना वर बैठकीच्या खोलीत. त्याला विचारा. तो जे सांगेल ते मला मान्य.' देविकाबाई म्हणाल्या.

मग देविकाबाई मोहनलाल बरोबर लाकडी जिना सावधपणे चढत पुढे झाल्या. 'जिना धोकादायक झालाय आईसाहेब. या वयात जर पाय घसरून पडला बिडलात तर केवढ्याला पडायचं? मला वाडा द्या न द्या पण हा जिना दुरुस्त करा. तुमची काळजी वाटतेय.'

'माझी काळजी परमेश्वराला. उद्याचं कुणी बघितलंय?'

'तुम्हा जुन्या माणसांचं हे असंच असतं बघा. सगळा हवाला त्या परमेश्वरावर! पण जीव आपला असतो. त्याला जपणं आपल्या हातात असतं.'

खरंतर देविकाबाईंना मोहनलालचा मनातून रागच आला होता. शकून सांगितल्यासारखा बोलत होता. काळ्या जिभेचा असला तर खरंच व्हायचं एके दिवशी... असा विचार मनात घोळवत त्या बैठकीच्या खोलीत आल्या. त्याच्या पाठोपाठ मोहनलाल आला. गोल वेताच्या आरामखुर्चीत हात हलवत, लाळ गाळत पंडितराव मागे पुढे झुलत होता व खिडकीत येऊन बसलेल्या चिमण्यांना पाहून हसत होता.

'पंडित, अरे मेहतासाहेब आलेत बघ.' देविकाबाई पुढं झाल्या. त्यांनी नॅपकिनने त्याची लाळ पुसली व म्हणाल्या, 'उप्पीट खाल्लंस, पाणी प्यायलास का नाही?'

'पिलो... खूप पिलो पाणी. उप्पीट मी खाल्लं. या चिमण्यांना पण दिलं.' पंडितराव तोंड वाकडं करत अडखळत म्हणाला.

'या ना, बसा या खुर्चीत. हा माझा मुलगा पंडितराव. हा जे सांगेल ते मला मान्य. वाड्याबद्दल यालाच विचारा.'

'हे काय सांगणार हो? तुम्हीच बोलायचं. यांची अवस्था अशी.' मोहनलाल म्हणाला.

'आम्ही सरदेशमुख घराण्यातल्या बायका. घरच्या पुरुषांच्या शब्दापुढे जात नाही. मग तो मुलगा असो की नवरा.'

'अहो पण... हा चिमण्यांशी खेळणारा. याला व्यवहारातलं काय कळणार?'

'ते काहीही असू दे. वाडा विकायचा की नाही त्याबद्दल हा जे सांगेल ते मान्य.'

'आई.' पंडितराव म्हणाला.

'काय रे राजा?'



'ओरडू नकोस ना. त्या चिमण्या उडून जातील.'

मोहनलाल हा वेडेपणा पाहातच राहिले. त्यांनी खिशातून रुमाल काढला व घाम पुसून परत घडी घालून ठेवला. त्यांचा प्रत्येक मिनिट हजार रुपये किमतीचा होता. आणि इथं तर चिमण्यांचा खेळ पाहात बसायची वेळ आली होती. ते विचार करू लागले. आपलं नशीब या वेड्याच्या हातात असावं की...

'विचारा याला.' देविकाबाई म्हणताच मोहनलाल खुर्चीतून उठला व पंडितरावापुढे हात जोडून नम्रपणे म्हणाला,

'साहेब, हा वाडा विकत घेऊन इथे मोठी इमारत बांधण्याचा विचार आहे. तुमची परवानगी असेल तर...'

''आईऽऽ''

'काय रे सोन्या?'

'आई, हा वाडा विकायचा नाही. वाडा गेला तर चिमण्याही जातील भुर्रकन उडून.'

'ऐका मेहतासाहेब, पंडितराव म्हणतो वाडा विकायचा नाही.' देविकाबाई म्हणाल्या.

'अहो पण त्या वेड्याच्या–'

'तोंड सांभाळून बोला आणि मुकाट्यानं जा. पुन्हा यायची गरज नाही.' देविकाबाईंच्या उच्चारात ठामपणा होता.

मेहता हात जोडून निघाला. त्याचा इतका अपमान कधीच झाला नव्हता. माझं नशीब त्या वेड्याच्या हाती गेलंच कसं? आणि तो कोण एवढा? अगदी चुटकीसरशी उडवू शकतो मी त्याला. माझं नशीब मीच घडवणार. असा विचार करत बूट वाजवत मेहता वाड्याबाहेर पडला. शेजाऱ्यापाजाऱ्यांना वाटले, बरं झालं या श्रीमंताच्या वस्तीतला हा दरिद्री वाडा आता हटेल. इथं मोठी अपार्टमेंट होईल. नवे शेजारी येतील.

पण तसं झालंच नव्हतं. मेहता अपमानित होऊन वाड्यातून बाहेर पडला होता आणि त्यानं मनाशी एक योजना निश्चित केली होती. त्याप्रमाणे तो चाल खेळणार होता. त्याने मोटार स्टार्ट केली आणि निघून गेला.

मोहनलालनं नोकरांकरवी देविकाबाईंची, पंडितराव व नानूमामाची गुप्तपणे चौकशी केली. नानूमामाच त्या घरचे सर्व व्यवहार पाहातो व त्याचे देविकाबाई विश्वासाने ऐकतात हे कळताच मोहनलालच्या डोळ्यात चमक आली. आशेचा किरण दिसू लागला.

मोहनलालने दोन दिवस जाऊ दिले व नंतर नोकराकरवी नानूमामाला बोलावणं धाडलं. शिलाईकामाचं मोठं ग्राहक मिळणार या आशेनं नानूमामा घाईघाईनं 'मेहता बिल्डर्स अँड डेव्हलपर्स'च्या कार्यालयात आला. तिथल्या सेविकेने नानूमामाला जरा थांबायला सांगितले. 'मेहता साहेब क्लायंटबरोबर बोलत आहेत. थोडा वेळ बसा.' कोचाकडे बोट दाखवत ती नम्रपणाने म्हणाली.

'मेहतासाहेब माझ्या ओळखीचे नाहीत. तरी पण मला बोलावले आहे. त्यांनी नक्की मलाच बोलावले आहे ना?' नानूमामाने विचारले.

'नाना मल्हारी आगलावे तुम्हीच ना?' सेविकेने प्रश्न केला.

'हो मीच. पण माझं काहीच काम त्यांच्याकडे नाही.'

'त्यांचं तुमच्याकडं काम असू शकतं.' सेविका हसत म्हणाली. त्यावर नानूमामा गप्प बसला. अर्ध्या तासाने नानूमामाला मोहनलाल मेहतांच्या केबिनमध्ये जाण्यास सांगण्यात आले. नानूमामा

त्या ऑफिसचा डौल, तिथले सुटाबुटातले कर्मचारी व कॉम्प्युटर्स पाहून बावरला होता. तो केबिनमध्ये जाऊन हात जोडून उभा राहिला. सरकत्या मऊ खुर्चीत मोहनलाल बसला होता.

'या नाना आगलावे. बसा खुर्चीत.' म्हणत मोहनलालने समोरच्या खुर्चीकडे अंगुलीनिर्देश केला.

'माझ्याकडं काय काम काढलंत साहेब?' नानूमामा चाचरत बोलला व खुर्चीत बसला. मोहनलालने हसून विचारले.

'चहा घेता की कॉफी.'

'काहीही चालेल.'

मोहनलालने इंटरकॉमवरून दोन कॉफी पाठवा असे बाहेरच्या सेविकेला सांगितले. नानूमामा मोहनलालच्या चेहऱ्याकडं अधीरतेनं पहात होता. मोहनलाल म्हणाला,

'नानासाहेब, समजा एका नव्या इमारतीत तुमच्या टेलरिंग दुकानासाठी अगदी फुकट गाळा दिला तर?'

'असा कोण कुबेर बसलाय हो?'

'मी देईन. शिवाय एक व्यवहार करायचा. जेवढ्या लाखाला हा व्यवहार ठरेल त्या प्रत्येक लाखावर दहा हजार तुमचे.'

'कसला व्यवहार? मी समजलो नाही मेहता साहेब.'

'वकिलांचा वाडा मला विकत हवा आहे. तिथे मी अपार्टमेंट बांधणार आहे. तळमजल्यावर दुकानगाळे काढून वर चार मजल्यावर फ्लॅटस् बांधायचा विचार आहे. पण तो वाडा विकायला त्या देविकाबाई तयार नाहीत. त्यांचा तो वेडा मुलगा म्हणतो वाडा विकायचा नाही. एका वेड्या मुलाचं ऐकून ती म्हातारी हाती आलेली लक्ष्मी घालवते आहे. तुम्ही त्या वाड्यात जाता येता. देविकाबाई नात्याने तुमची बहीण लागते असं कळलं. जर हा व्यवहार तुम्ही जमवून दिला तर लक्ष्मी तुमच्या घरी पाणी भरेल. पाहिजे तर अपार्टमेंटचे नाव वकील अपार्टमेंटस् देऊ. नावासाठीच जर आग्रह असेल तर...' मोहनलालने इच्छित सांगितले.

'हे काम अवघड आहे हो. त्या पंडितरावचेच ती ऐकणार.'

'काम सोपे असते तर तुम्हाला कशाला बोलावले असते हो? बघा विचार करा, मला घाई नाही. पण महिन्याभरात निर्णय हवा.' मोहनलाल म्हणाला. एवढ्यात कॉफीचे मग घेऊन ऑफिसबॉय आला. नानूमामा अधाशीपणाने कॉफी पिऊ लागला.

'मेहतासाहेब बघतो प्रयत्न करून.' कॉफीचा मग ठेवून नानूमामा उठू लागला. तेव्हा ड्रॉवर उघडून हजार रुपयांचे पाकीट देत मोहनलाल म्हणाला, 'हे हजार रुपये तुम्हाला बक्षीस. प्रयत्न करण्यासाठी!'

'हो. हो. तुम्ही शब्दाचे पक्के दिसता.' म्हणत हजार रुपयाचे पाकीट घेऊन नानूमामा केबिनमधून बाहेर आला. मोहनलालच्या गळाला मासा लागला होता.

रात्री नानूमामा आपल्या पत्नीशी बोलताना हळू आवाजात म्हणाला, 'अगं पारू, आजपर्यंत आपण खूप कष्टात दिवस काढले. प्रामाणिक राहिलो पण आता हे दिवस पालटवायाचे असतील तर अप्रामाणिक व्हायला लागेल. लक्ष्मी अगदी आपल्या उंबऱ्याबाहेर उभी आहे.'

'नीट बोलला तर कळेल ना!' नानाची बायको म्हणाली.

'अगं ते मेहता बिल्डर आहेत ना, त्यांनी देविकाचा वाडा विकत मागितला होता. शिवाय राहायला एक फ्लॅट व वीस लाख रुपये देतो म्हणाले होते तिला. पण ती सरदेशमुख घराण्याच्या रितीप्रमाणे म्हणाली, पंडित सांगेल तसं.'

'मग?'

'मग काय पंडित वेडा. म्हणाला वाडा विकायचा नाही! तर देविकाही तसंच म्हणाली मेहता साहेबांना.'

'त्यांचं घराणंच वेड्याचं. काय आहे त्या वाड्यात आणि किती दिवस जगणार आहे हो ती थेरडी?'

'मला मेहता साहेब म्हणाले, काहीही करा आणि हा व्यवहार जमवून द्या. तुम्हाला एक दुकानगाळा फुकट देतो. शिवाय जेवढ्या लाखाला हा व्यवहार ठरेल त्या प्रत्येक लाखावर दहा हजार बक्षीस.'

'अगं बाई एवढे?' पारू डोळे मोठे करीत म्हणाली.

'एवढे आणि तेवढे! आपल्याला काय उपयोगाचे? ती देविका वेडी. तो पंडित तर सातवेडा. माझंच नशीब फुटकं.' नानूमामा म्हणाला.

'इतकी वर्षं त्या माय-लेकरांसाठी राबताय. सुतळीच्या तोड्याची इच्छा ठेवली नाहीत. मग आता संधी आलीय तर माघार घेऊ नका.' पारू ठासून बोलली.

'काय करू तूच सांग.'

'काहीही डोकं चालवा आणि त्या मायलेकरांचे कोऱ्या स्टॅम्प पेपरवर अंगठे घ्या. देविका अशिक्षित. तो वेडा दुसरी नापास. सोप्पं आहे.'

'अरे वा! हे माझ्या डोक्यातच आलं नाही.'

'एकदा का अंगठे घेतले की सगळंच आपलं हो. वीसच काय घेऊन बसलात पंचवीस-तीस लाख रुपये मिळतील.' पारूनं नानूमामाच्या डोक्यात किडा सोडला. त्या क्षणापासून नानूमामा अस्वस्थ झाला.

दुसऱ्या दिवशी नानूमामा भाजीपाला घेऊन त्या वाड्यात गेला. तेव्हा नानूमामाला चहासाठी थांबवत देविकाबाई म्हणाल्या, 'अरे नाना, सांगायला विसरलेच बघ. चार दिवसापूर्वी मेहता

नावाचा एक बिल्डर आला होता. म्हणाला की वाडा मला विकत द्या. आम्ही सरदेशमुख; पुरुष सांगणार त्या ऐकणाऱ्या आम्ही या वाड्याच्या सुना. मी म्हणाले, माझ्या मुलाला विचारा.'

'मग?'

'मग काय पंडित म्हणाला, हा वाडा विकायचाच नाही. अरे कधी नाही तो पंडित त्या दिवशी टाळ्या वाजवत हसत होता. का माहिताय? अरे खिडकीत चिमण्या येऊन बसल्या होत्या आणि त्यानं फेकलेलं उप्पीट खात होत्या. माझा मुलगा त्या बैठकीच्या खोलीत हसतोय मग हा वाडा विकायचं धाडस तरी होईल का रे नाना?'

'अगं, वाडा विकल्यावर नव्या जागेत चिमण्या येणार नाहीत का? समज नाही आल्या तर रंगीत चिमण्या मिळतात की विकत. त्या पिंजऱ्यात ठेवायच्या.'

'हो त्या फ्लॅटच्या पिंजऱ्यात बंद असलेली कुटुंबे म्हणजे बंद पिंजऱ्यातल्या चिमण्याच की!'

'कशाला काहीतरी जोडू नकोस ताई! तू लक्ष्मी लाथाडलीस त्या वेड्याचं ऐकून–' नानूमामा म्हणाला.

'खबरदार त्याला वेडा म्हणालास तर! त्याचा तू मामा आहेस. तो तुझ्यावर किती माया करतो आणि तू त्याला वेडा म्हणतोस?' देविकाबाई चिडल्या. दोघेही नंतर गप्प बसले. चुलीवर चहाचं आधण उकळल्यावर नानूमामाला त्यांनी चहा दिला. चहा पिताना नानूमामाला पारूनं सांगितलेल्या स्टँप पेपरची आठवण झाली. चेहरा निवळता घेत तो म्हणाला,

'बरं वाडा विकू नकोस, पण जरा माणसासारखं वाटावं. वाड्यात उजेड असावा म्हणून लाईट तरी घेशील का नाही?'

'किती खर्च येईल?'

'खर्चाचं मी बघतो. लाईट घ्यायची का ते बोल. दारापुढं बल्ब राहील. मागील दारी उजेड राहील. सर्प विंचूचं भय राहणार नाही.'

'मी पाटल्या मोडते आणि पैसे देते. लाईट घेऊ. रोज कंदील पुसायचा अन् समयांत तेल ओतायचा मला कंटाळा आलाय नानू.'

'मग ठरलं तर! लाईट घ्यायची.'

'मी घराबाहेर पडणार नाही. सगळी धावपळ तू करायचीस. तर लाईट घेऊ.' देविकाबाई म्हणाली.

'ते तर करणारच! एक दोन कागदावर तुझे न पंडितचे अंगठे घ्यावे लागतील. ॲफिडेव्हीट करावे लागते.'

'घेऊन ये कागद.' देविकाबाई म्हणाल्या. तसा नानूमामा मनातून खूश झाला आणि चहा पिऊन वाड्यातून झर्रकन बाहेर पडला.